## निशाण क्र. ५१ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांचे नाव कमी करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेबाबत दिलेला आहे. सदर प्रतिवादी क्र. ४ विलासिनी यशवंत खोत ही दि. ०९/०९/२०१९ रोजी मयत झाली आहे. त्यांचे वारस प्रतिवादी क्र. १, २ व ३ हेच आहेत. तरी प्रतिवादी क्र. ४ यांचे नाव दाव्यातून कमी करण्यात यावे व तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून हरकत घेतली आहे. त्यांचे म्हणण्यानुसार, ३ वर्षे विलंब झालेला आहे. अर्जात नमूद कारण योग्य व संयुक्तिक नाही. सबब, सदरचा अर्ज खर्चासह फेटाळणे यावा.

३. प्रतिवादी क्र. ४ यांना प्रतिवादी क्र. १, २ व ३ हेच वारस असल्याचे वादी यांनी पटलावर आणलेले आहे. त्यांचे व्यतिरीक्त इतर कोणी वारस असल्याचे वादी यांनी पटलावर आणलेले नाही. सदर दावा हा ५ वर्षे जुना आहे. सबब झालेल्या विलंबाबत वादी यांनी प्रतिवादीस खर्च देणे उचित वाटते. सबब अर्ज मंजूर करण्यात येत आहे. परिणामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

### आदेश

१. अर्ज रक्कम रु.१००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो. वादी यांनी रक्कम रु. १००/– प्रतिवादी यास दयावेत.

२. वादीने आजपासून चौदा दिवसांचे आत दाव्यात दुरुस्ती करुन तशी दुरुस्ती प्रत याकामी हजर करणेची आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्थळ: देवगड ( बी. आर. पाटील )
दिनांकः २९/०१/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

BALKRISHNA RAJARAM PATIL

Digitally signed by BALKRISHNA RAJARAM PATIL
Date: 2022.01.29 17:42:56 +0530